# दिल्ली सरकारची पाणी सबसिडी

अरुण जेटली
विरोधी पक्षनेते, राज्यसभा

सबसिडी अज्ञात वर्गासाठी दिली जाणारी अशी राशी आहे ज्याची मात्र निश्चित नसते. सबसिडी द्वारे सरकार दर किंवा मूल्य यात कपात करू शकत नाही. यापासून दर किंवा शुल्क ठरविले जाऊ शकतात. यात कोणत्या एका वर्गाला मदत करण्यासाठी फक्त करदात्यांच्या धनाचा उपयोग केला जातो. जेवढी जास्त सवलत, मदत दिली जाईल करत तेवढीच वाढ होईल. सरकार अल्पवाधीच्या फायद्यासाठी सबसिडीचा आश्रय घेते. यामुळे भविष्यात कर वाढतील आणि कमकुवत लोकांसाठी हे नुकसानदायक होऊ  शकते. त्या लोकांचे उदाहरण घेउया जे मीटर व्यवस्थेतून २० किलो लिटर पेक्षा कमी पाण्याचा वापर करतात. सबसिडीची आपूर्ती करणाऱ्या संस्थेवर याचा विपरीत परिणाम होऊ शकेल. वास्तविक समस्या हि आहे की ज्या लोकांना पाणी पोचवले गेले पाहिजे ज्यांना पाणी मिळत नाही आहे. प्रत्येक विभागात पाईपलाईन टाकणे, सर्व घरातून नळ बसवणे हे काम जे जल बोर्ड करील जे आर्थिक दृष्ट्या कमकुवत नसून मजबूत असेल. पाण्याच्या सबसिडीची व्यवस्था करताना समाजाच्या सर्वात कमकुवत वर्गाची मात्र  उपेक्षा केली गेली आहे. ते या योजनेच्या बाहेर आहेत. असे विभाग जेथे पाईपलाईन नाही आहे, अशी घरे जिथे नळ नाही आहेत, ज्या घरांना मीटर लागलेले नाहीत, ज्या घरांना खराब मिटर लागले आहेत, ते सबसिडीस पात्र नाही आहेत. नवी दिल्ली नगरपालिका क्षेत्रातील घर विशेषतः अशी घरे जेथे कमी पगार असलेले कर्मचारी राहतात आणि दिल्ली छावणी क्षेत्रातील घरांना पाण्याची सबसिडी मिळणार नाही.या सबसिडीत सर्वात कमकुवत असलेला वर्ग मोडत नाही फक्त तेच लोक येतात ज्यांच्या घरी मीटर चे नळ आहेत.

दिल्लीत सुमारे १८ लाख पाण्याचे कनेक्शन आहेत. यापैकी ८.५लाख घरांचे मीटर चालू आहेत. सुमारे ५ लाख खराब मीटर आहेत किंवा ते चालू नाहीत. उरलेल्यांपैकी मीटर नाही आहेत. दिल्लीत मोठ्या संख्येत झोपडपट्टीत पाण्याचे कनेक्शन नाही आहे आणि त्यांना मोफत पाणी योजनेचा लाभ मिळत नाही. ते टंकर वर अवलंबून असतात. अनेक अनधिकृत कॉलनीत पाईपलाईन नाही आहे आणि त्यामध्ये पाईपलाईन टाकणे आहे. तिथे वेगवेगळ्या घरांसाठी कनेक्शन नाही आहेत. त्यामुळे ते मोफत पाणी योजनेच्या अंतर्गत येत नाहीत. अनेक सहकारी आवास सोसायटीत एकच कनेक्शन आहे, प्रत्येक फ्ल्याट ला वेगळे असे कनेक्शन नाही आहे. त्यांना पण मोफत पाणी मिळू शकत नाही. दिल्ली च्या मध्यम वर्गातील काही लोक, ज्यांचे कनेक्शन मीटर ने जोडले गेले आहेत आणि जे २० किलो लिटर पेक्षा कमी म्हणजेच प्रतिदिन फक्त ६६६ लिटर पाण्याचा वापर करतात जे मोफत पाणी मिळण्यास पात्र आहेत.

जे लोक २० किलो लिटर पेक्षा अधिक पाण्याचा वापर करतात त्यांच्याकडून वापर केल्या जाणारया पूर्ण पाण्याची वसुली केली जाईल, ते सुद्धा शुल्कात १० टक्क्यांनी वाढीसह. दिल्ली ला चार श्रेणीत विभागले गेले आहे. पहिल्या श्रेणीत जे लोक येतात ज्यांच्याकडे नळ आणि पाईपलाईन कनेक्शन नाही आहे. ते योजनेपासून बाहेर आहेत. जे लोक ज्यांचे मीटर खराब आहेत किंवा ज्यांच्याकडे मीटर नाही आहे ते सुद्धा या योजनेपासून बाहेर आहेत मात्र त्यांना पाण्याचे पैसे देणे आहे. फक्त असे लोक ज्यांचे मीटर काम करत आहेत आणि ज्यांची पाण्याची खपत २० किलो लिटर प्रति महिन्यापेक्षा कमी आहे त्यांना या योजनेचा लाभ मिळेल. अन्य लोक ज्यांची पाण्याची खपत २० किलो लिटर पेक्षा जास्त आहे त्यांना १० टक्के अतिरिक्त पैसे भरावे लागतील. या योजनेचा लाभ वर दिल्या गेलेल्या चार श्रेणीपैकी फक्त एका श्रेणीच्या अंतर्गत येणाऱ्या काही लोकांनाच मिळू शकतो आणि हे लोक सर्वात कमकुवत असलेल्या वर्गात शामिल नाही आहेत.